# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/06/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## हयगयीने मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०६ किमी अंतरावर बायपास कॅनल खापरखेडा येथे दिनांक २०/०६/२०२३ चे १३.३० वा. सुमारास यातील **मृतक नामे— चेतन आनंदराव खंगारले, वय १५ वर्ष, रा. वार्ड क्र. ५ न्यु नांदा** व त्याचे मित्र विधीसंघर्ष बालक व क्रिष्णा खंगारले, निखील खंगारले हे पोहण्याकरीता नांदा येथे नहर वर गेले असता विधीसंघर्ष बालक हा पाण्यात पोहत असता तो पाण्यात बुडु लागल्याने पार वर बसलेल्या मृतक चेतन खंगारले याचा पाय धरुन विधीसंघर्ष बालक हा वर येण्याचा प्रयत्न करत असता मृतक खाली खोल पाण्यात पडला व पाण्याचेवर येण्यासाठी मृतक चेतनचा गळा दाबल्याचे चेतन खंगारले याचा मृत्यु झाला, तरी सदर चौकशीमध्ये विधीसंघर्ष बालक याने स्वत:चा जिव वाचवितांना खोल पाण्यातुन बाहेर येण्यास मृतक याचा गळा दाबुन त्याला मारण्याचा कोणताही उद्देश नसतांना त्याचे मृत्युस कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस उपनिरीक्षक सुर्यप्रकाश मिश्रा, पोलीस स्टेशन खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे विधीसंघर्ष बालक याचे विरूद्ध कलम ३०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक लक्ष्मी मलकुवार मो. नं. ९६२३६८७६२७ या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील सावनेर ते नागपुर नागोबा मंदीर जवळ माळेगाव सावनेर येथे दिनांक २१/०६/२०२३ चे १९.०० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिलीप रामकृष्ण पांडे, वय ३४ वर्ष रा. खुमारी ता. कळमेश्वर जि. नागपुर याचे भाऊ नंदु पांडे, **वहीनी मृतक नामे— सौ. पल्लवी नंदु पांडे वय २३ वर्ष,** पुतणी कु. लावण्या व पुतण्या मानस असे मोटरसायकल क्र. एम. एच.— ४० बी. झेड— ६९७६ ने सावनेर वरून मानेगाव येथे जात असता सावनेर ते नागपुर हायवे वर नागोबा मंदीरजवळ माळेगाव येथे त्याचे मोटरसायकलला मागुन कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक मारल्याने वहीनी सौ. पल्लवी नंदु पांडे, वय २३ वर्ष हया मरण पावल्या असुन भाऊ नंदु पांडे याला छातीला, पुतणी लावण्या हिला डोक्याला व पुतण्या मानस याला डोक्याला मार लागला असुन वहीनी सौ. पल्लवी पांडे यांचे मरणास भाऊ नंदु पांडे, पुतणी कु. लावण्या व पुतण्या मानस यांचे जखमी होण्यास कोणीतरी अज्ञात वाहनाचा चालक कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिलीप रामकृष्ण पांडे, वय ३४ वर्ष, रा. खुमारी ता. कळमेश्वर जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४, १३४ बी मोटर वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक सुधाकर शेंद्रे मो. नं. ८६०५००१६५१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर